VOL- VII ISSUE- II FEBRUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# आपुला चि वाद आपणांसी मधील गांधी विचारांचा प्रभाव

डॉ लहू वाघमारे
(मराठी विभाग)
शिवजागृती महाविद्यालय नळेगाव.
ता.चाकूर, जि.लातूर

मराठी साहित्याच्या उदयापासूनच या साहित्यावर वेगवेगळया विचारधारांचा व विचार प्रवाहांचा प्रभाव असलेला दिसतो .1920 च्या दरम्यान तर अनेक विचारधारा आपल्या देशामध्ये सुरू झाल्या. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीला अधिक जोम आला. म. ज्योतिबा फुले म.गांधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचे आणि विविध घडामोडींचे चित्रण तत्कालीन साहित्यातून आविष्कृत झाले आहे. या महापुरुषांच्या विचारधारा आणि कार्याचे वेगवेगळे विचारप्रवाहकधी एकमेकाला पूरक ठरले. तर कधी ते एकमेकांच्या परस्परविरोधी ठरले. या महापुरुषांच्या विचारधारांचे मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणामध्ये पडसाद उमटलेले दिसून येतात.म.गांधीच्या जीवनकार्याचा मराठी जनमानसावर अधिक खोलवर परिणाम झाला.

गांधीजींनी इंग्रजांना 'चलेजाव' हा निर्वाणीचा इशारा दिला आणि 'खेड्याकडे चला' ही सबंध भारतीयांना हाक दिली.ही हाक तत्कालीन समाज जीवनामध्ये खूप महत्त्वाची ठरली. तरुणांची एक पिढीच्या पिढी या विचाराने भारावली गेली. तत्कालीन सर्जनशील व प्रतिभावान साहित्यिकांच्या साहित्य लेखनावरही महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव पडला. त्यातूनच गांधी विचारांचे फार मोठे साहित्य लिहिले गेले. जवळजवळ गेल्या शंभर वर्षांपासून मराठी साहित्याने महात्मा गांधीच्या विचाराला भरभरून अभिव्यक्त केले . 'आपुलाचि वाद आपणाशी' हे आत्मकथनही म. गांधी यांच्या विचार आणि तत्वज्ञानांनी परिपूर्ण असे आहे. कारण या आत्मकथनाचा अभ्यास करत असताना म. गांधीजींच्या विचारांचा व तत्त्वज्ञानाचा प्रभाव या ग्रंथात जागोजागी असलेला आढळतो. या आत्मकथनाचे लेखक चंद्रकांत वानखडे यांच्यावर बालपणापासूनच जे संस्कार झालेले आहेत. ते म. गांधी यांच्या विचार व तत्त्वांचे झालेले आहेत. त्यांच्या घरातील वातावरणही मुळात गांधीवादी होते. गांधींच्या हत्येनंतर जन्माला आलेल्या पिढीचे लेखक एक प्रतिनिधी आहेत. त्यामुळे गांधींना जिवंतपणी पाहण्याचा योग त्यांना आला नसला तरी त्यांच्या बालपणीच्या वातावरणात गांधींचे भारलेपण होते. त्यांच्या घरात म. गांधीजींचे स्थान संतांच्या देव्हाऱ्यात व हृदयाच्या गाभा-यात होते. बाहेरच्या जगात गांधीविषयी असलेला भक्तिभाव,घराच्या देव्हाऱ्यात असलेले गांधींचे स्थान, शाळेत उत्साहात होणारी गांधी जयंती, त्यानिमित्ताने ऐकलेली भाषणे, प्रभात फेरीत उत्साहाने दिलेल्या घोषणा, 'पुढे चला रे पुढे चला गांधीजी की जय बोला' अशा वातावरणात लेखकाच्या बालमनाचे भरण-पोषण झाले. म्हणूनच

त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर महात्मा गांधी यांच्या विचारांचा, तत्त्वज्ञानाचा खोलवर प्रभाव पडला. म. गांधींच्या या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर व कार्यावर असलेल्या प्रभावाचे वर्णन या आत्मकथनातील इतरही काही प्रसंगातून व्यक्त झाले आहे.लेखक आठव्या वर्गात असताना वडिलांच्या सतत होणाऱ्या बदल्यांमुळे होणारी शिक्षणाची हेळसांड थांबवण्यासाठी लेखकाला मामाकडे म्हणजे अमरावतीला शिक्षणासाठी ठेवण्यात आले. त्यावेळी नावाजलेल्या लंगोटी शाळेत त्यांना प्रवेश मिळाला. या शाळेतील वातावरण गांधीविरोधी होते. आत्तापर्यंतच्या शिकलेल्या शाळेत त्यांना गांधी वंदनीय होते. तर या शाळेत मात्र ते निंदनीय होते.आधीच्या जगात नायक असलेले गांधी या शाळेच्या जगात खलनायक होते. याचा धक्का गांधी विचाराने भारावलेल्या लेखकाच्या बालमनाला बसला.त्या शाळेतील शिक्षक गांधीजींची निंदानालस्ती करतात. परंतु लेखकांच्या मनातील गांधीच्या स्थानाला तसूभरही धक्का पोहोचत नाही.त्या शाळेतील शिक्षकांविषयी त्यांना आदर वाटेनासा झाला. त्या शाळेतील कोणतेही शिक्षक विषय कोणताही असला तरीही ते गांधीवरच यायचे.मोहनदास गांधी याना ते मौलाना गांधी म्हणायचे. हा गांधी किती हलकट, बावळट मूर्ख आहे .याचे रसभरीत वर्णन ऐकवायचे. गांधीजी हे तर त्यांचे आवडते विषय होते. लेखकांचा गांधी किती स्त्रीलंपट आहे. हे सांगताना त्यांना खांद्यावर हात ठेवायला तरुण मुलीच कशा लागतात. हेही ते ठोस पुरावा देऊन मांडायचे. आपल्या मृत्यूनंतर आपले चांगले चरित्र कोणी येणार नाही. म्हणून 'माझे सत्याचे प्रयोग' हे आत्मचरित्र त्यांनी कसे लिहिले. हेही एक दिवस वर्गात त्यांनी सांगितले. गांधीजींची अशी निंदानालस्ती करताना सावरकरांच्या कार्याचे मात्र ते कौतुक करायचे.एके दिवशी वर्गात शिक्षकांचे गांधी चिवडणे सुरू झाले. महात्मा गांधी एवढे स्त्रीलंपट होते की. त्यांनी नातीलासुद्धा सोडले नाही. हा थेरडा शेवटच्या दिवसांमध्ये आपल्या नातीसोबत शय्यासोबत करीत होता. अशा आशयाचे गुरुजींचे निरूपण सुरू झाले. हे त्या वयात लेखकाच्या सहनशीलतेच्या पलीकडे गेले. आपल्या घरी देवालयात बसविलेला माणूस एवढा हलकट कसा असू शकतो आणि इतक्या हलकट असलेल्या माणसाला देवाऱ्यात स्थान देण्याइतपत आपले आई-वडील काही मूर्ख असू शकत नाहीत. असे त्यांना वाटले. ते रागाने ताडकन उभे राहिले आणि शिक्षकाला त्यांनी या वक्तव्याबद्दल जाब विचारला. तुमच्या सावरकरांनी तरी काय दिवे लावले.समुद्रात उडी मारण्यापलीकडे तरी त्यांनी दुसरे काय केले? असा प्रश्न त्यांनी शिक्षकाला विचारल्यामुळे सारा वर्ग स्तब्ध झाला. त्यामुळे त्यांना शिक्षकांच्या छड्या खाव्या लागल्या. त्या छड्यांची बरसात आजही लेखकांच्या स्मरणात आहे.गांधीनिष्ठ असलेल्या लेखकांना गांधीजींबद्दल काढलेले अपशब्द सहन झाले नाहीत. यातूनच त्यांची गांधी तत्वज्ञानावर असलेली निष्ठा व्यक्त होते .ही निष्ठा आठव्या वर्गात शिकणाऱ्या लेखकाच्या बालमनाची आहे. ती आजही कायम आहे. आत्मकथनातून वर्तमान काळातही त्यांच्या मनात गांधींजीबद्दलअसलेली निष्ठा ते व्यक्त करतात. जगाने 21 व्या शतकातील थोर पुरुष म्हणून गांधींना निवडले. आजही जागतिक पातळीवर महात्मा गांधींचा देश म्हणून भारत देश ओळखला जातो केवळ आपल्या

देशामध्ये नव्हे तर जगातील 140 देशांमध्ये महात्मा गांधींचे पुतळे बसविलेले आहेत. त्यामुळे लंगोटी शाळेत शिक्षकांनी गांधीजीबद्दल काढलेले उद्गार कसे खोटे आहेत. ते लक्षात येते. जागतिक स्तरावर महात्मा गांधीवर जेवढ्या विपुल प्रमाणात लिहिले गेले,तेवढे क्वचितच इतरांवर लिहिले गेले असावे. महात्मा गांधीवर सिनेमाही निघाला. तो एका परदेशी माणसांनी काढला. आणि तोही जागतिक पातळीवर गाजला.याचा अर्थ गांधी हही जागतिक पातळीवर ओळखली जाणारी महान व्यक्ती आहे. अशा गांधींची जागतिक पातळीवर असलेली महानता लेखकाने आपुलाचि वाद आपणांसी या आत्मकथनातून साक्षात केली आहे. महात्मा गांधींवर टीकास्त्र झोडणाऱ्या अनेक व्यक्ती आणि संघटना आज कार्यरत आहेत. पण त्यांनाही मजबुरीने का होईना प्रातःस्मरण आज गांधीजींचे स्मरण करावे लागते. यातच गांधी सामर्थ्याचे दर्शन होऊन जाते. असे लेखकांना वाटते. येथे यांचे भाषेतील काटकसरीचे तत्व लक्षात येते.आज एवढ्या वर्षानंतर गांधीजींचे परिपूर्ण चरित्र आकलन झाल्यानंतर लेखकाला वाटते की, त्या शिक्षकांची नंतरच्या आयुष्यात भेट झाली असती तर त्यांनी त्यांच्या सर्व आरोपांना खारीज करणारी उत्तरे दिली असती.परंतु तो क्षण कधी आला नाही. याची खंत त्यांना वाटते. बालपणापासून त्यांच्यावर झालेले गांधीविचारांचे हे संस्कार पुढे त्यांच्या व्यक्तिमत्वात कायमस्वरूपी रुजले. सत्य ,अहिंसा आणि मानवता पुढे त्यांनी आपल्या आचरणातही आणली आणि लोकांनाही सांगितली व त्यांनी स्वतःही ती पाळली.भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधीजी यांनी 1942 साली 'चले जाव 'चळवळ सुरू केली आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. ही बाब स्वतंत्र भारतासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आणि या स्वतंत्र भारतात स्वातंत्र्यानंतर 26 जून 1975 रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लागू केली आणि लोकशाही धोक्यात आली. ही घटना गांधीजींच्या विचारांनी भारावून गेलेल्या चंद्रकांत वानखडे यांना सहन झाली नाही. त्यांनी आणीबाणीविरुद्ध पोस्टर लावले आणीबाणी म्हणजे लोकशाहीच्या विरोधी वर्तन आहे .लोकशाहीचे वस्त्रहरण आहे . म्हणून आणीबाणीविरुद्ध त्यांनी आपल्या काही मित्रांबरोबर प्रचार केला. त्यासाठी त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. महात्मा गांधी यांच्या तत्वज्ञानाने आणि विचाराने कार्य करणा-या अनेक गांधी अनुयायांचा लेखकाला आदर वाटतो. त्यांच्यासोबतही त्यांनी तळमळीने कार्य केले आहे .विनोबा भावे यांनी गांधी विचार जोपासला. महात्मा गांधींचे कार्य करण्यासाठी त्यांनी पवनार येथे आश्रम काढला. व गांधीजींनी सांगितलेले कार्य त्यांनी अजन्म केले.त्या आश्रमाशी चंद्रकांत वानखडे यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. एस. एम .जोशी हे महाराष्ट्रातील गांधी विचारांचे अनुकरण करणारे ज्येष्ठ समाजवादी नेते आहेत. त्यांच्या सहवासात राहून चंद्रकांत वानखडे यांनी महात्मा गांधी यांचे कार्य करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यासोबत आणिबाणीचा प्रचार करताना ते गावोगावी फिरले. तेव्हा त्यांच्या आचरणात त्यांना गांधी विचारांचे व तत्वांचे दर्शन झाले.त्यांची शांत वृत्ती,त्यांची सहनशीलता, त्यांचा सदाचार लेखकाला भारावून टाकणारा वाटला. त्यामुळे त्यांच्याही व्यक्तिमत्त्वात हे

गुण रुजत गेले.त्यांचाही राग हळूहळू कमी झाला. अहंकार गळून पडला. महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसाआणि मानवता या तत्त्वांचे पालन लेखक चंद्रकांत वानखडे यांनी स्वतःहून केले आहे. त्याचा प्रत्यय या आत्मकथनात जागोजागी येतो. त्यांनी जेव्हा बीएडच्या प्रवेशासाठी फॉर्म भरला. तेव्हा त्यांचे आजोबा त्या शिक्षण संस्थेचे सदस्य होते. म्हणून त्यांना कमी गुण असतानाही आजोबांनी त्यांचा नंबर बीएडला वशिला लावून लावला. परंतु सतीश निमकर हा विद्यार्थी हुशार असूनह त्याला अधिक गुण असूनही त्याचा नंबर मात्र बीएडला लागला नाही .ही वर्तमानकालीन वशिलेबाजी माणुसकीला काळीमा फासणारी आहे. म्हणून लेखकांनी आपला बीएडला लागलेला नंबर रद्द केला. प्रवेश नाकारला. एवढेच नाही तर पुढील भविष्य काळात वशिलेबाजीची चीड येऊन त्यांनी आपल्या सर्व पदव्या जाळून टाकल्या आणि नोकरीचा व सुखी जीवनाचाही त्याग केला. 'खेड्याकडे चला' अशी हाक महात्मा गांधींनी भारतीयांना दिली होती. 75टक्के भारतीय समाज खेड्यात राहतो. म्हणून खेड्यांचा विकास झाला पाहिजे. असे महात्मा गांधींची धारणा होती. हे सूत्र चंद्रकांत वानखडे यांनी कार्यकर्ता म्हणून कार्य करीत असताना अमलात आणले. "छात्र युवा संघर्ष वाहिनी"चे कार्य करताना महाराष्ट्राचा संयोजक म्हणूनही कार्य करताना त्यांनी खेड्यांच्या विकासाचे कार्य केले. "मेटीखेडा' या यवतमाळ जिल्ह्यातील एका अत्यंत छोट्याशा गावात जाऊन त्यांनी शेतमजुरांचा लढा उभारला. त्यांना न्याय मिळवून दिला. रोजगार हमी योजनेत मजुरांचे, शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबविण्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांशी संघर्ष केला. त्यात त्यांना मारहाणही झाली .उमरपोड या आदिवासी गावाचा तर त्यांनी कायापालटच केला. पत्नी माया कुलकर्णी यांच्या सोबतीने त्यांनी या गावाचे पूर्ण रुपच बदलून टाकले. मेटीखेडा गावही हुंडामुक्त करण्यासाठी या पती-पत्नीने महत्त्वाचे कार्य केले. लाडेगाव येथील बेंबळा नदीत शेजारच्या गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी विहीर खोदण्यात आली होती. त्या विहिरीचा इतर गावांना पाणीपुरवठा होऊ लागला होता .त्यामुळे गावाला पाणी कमी पडू लागले होते. त्यातच 1994 सारी दुसरी एक नवीन विहीर खोदून इतरही अनेक गावांना पाणी देण्याची योजना सरकारने आखली होती. यावेळी गावकऱ्यांनी सरकारच्या या योजनेला कडाडून विरोध केला. त्यामुळे सरकार आणि गावकरी यांच्यात तेढ निर्माण झाली. तेव्हा चंद्रकांत वानखडे यांच्याकडे हा प्रश्न हाताळण्याची जबाबदारी आली .तेव्हा म. गांधीचे अहिंसावादी व सत्यवादी तत्व समोर ठेवून लेखकांनी सर्व गावकऱ्यांना बांधावर थांबवले व सरकारी पोलिस अधिकाऱ्यांसमोर सर्व परिस्थिती मांडली आणि हा प्रश्न त्यांनी शांततेने मिटवला. प्रत्येक ठिकाणी महात्मा गांधीच्या तत्त्वाचे पालन करत जीवन जगणाऱ्या लेखक चंद्रकांत वानखडे यांनी गांधी विचारांतील तत्त्वांची पायमल्ली करणाऱ्या अनेकांना वेळोवेळी खडसावले आहे. या आत्मकथनातून अशा अनेक व्यक्तींची स्वार्थी, ढोंगी आणि दुटप्पी भूमिका समोर आणली आहे. शरद जोशी हे शेतकरी संघटनेचे पंचप्राण होते. त्यांनी दहा वर्ष अथक परिश्रमाने सबंध भारतामध्ये शेतकरी संघटना उभा केली. ती वाढवली. शेतकऱ्यांसाठी अनेक प्रश्न अभ्यासपूर्ण व खंबीरपणे मांडले. काही काळ

शेतकऱ्यांना न्यायही मिळवून दिला. परंतु त्यांना कॅबिनेट मंत्र्याच्या दर्जाचे पद तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी देऊ केले त्याबरोबर त्यांनी शेतकरी संघटना बरखास्त करण्याचा निर्णय घेतला. त्यांचे संघटनेच्या कार्यकर्त्यांत भांडणे लावणे.नोकर आणि ड्रायव्हर यांच्यात फूट पाडणे. पूर्वी पक्ष न काढण्याची घोषणा करून सत्ता भोगण्यासाठी पक्ष काढणे. असे दुटप्पी ,स्वार्थी आणि गांधीविरोधी असलेले वर्तन लेखकांनी या आत्मकथनातून प्रभावीपणे मांडले आहे .सुहास हा स्वतःला गांधीवादी विचाराचा समजणारा आहे.परंतु गांधी विनोबाचे नाव घेऊन त्यांच्या तत्वांविरुद्ध वर्तन करणारा ढोंगी कार्यकर्ता आहे. त्याच्या ढोंगीपणाचे चित्रण या आत्मकथनातून आले आहे. लेखकाच्या नावाचा उपयोग करून घेऊन तो शिक्षणसंस्था काढतो. आपल्या संस्थेतील शाळेत मायाची मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती करतो आणि शाळेला अनुदान मिळताच मायाला नोकरीहून काढण्यासाठी अनेक खटपटी करतो. त्याच्या या गांधी विरोधी तत्त्वज्ञानाचे अत्यंत जिवंत चित्रण या आत्मकथनात आले आहे. आजच्या समाजव्यवस्थेत महात्मा गांधी यांच्या विचारांची होणारी पायमल्ली त्यामुळे असत्य,हिंसा आणि अमानुषता यांचा आजच्या समाजव्यवस्थेत आलेला ऊत लेखकाने प्रकट केला आहे. शिक्षणक्षेत्र, राजकारण यातील तत्त्वहीनताही त्यांनी प्रकट केली आहे .स्वतः दिग्रस मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढविली .त्यातून खालच्या स्तराला गेलेली माणसे ,निवडणुकांतील पैशाचा होणारा गैरवापर त्यामुळे धोक्यात आलेली लोकशाही व देशाचे अंधकारमय भवितव्य यासंबंधीचे विविध अनुभव लेखकाने या आत्मकथनातून प्रकट केले आहेत .तसेच महात्मा गांधीजींचे विचार करणाऱ्या व त्यांच्या तत्त्वांप्रमाणे जगणाऱ्या जयप्रकाश नारायण , विनोबा भावे या महान तपस्वी आणि गांधीवादी विचारांच्या व्यक्तींच्या आदर्शवत जगण्याचे आणि त्यांच्या मूल्यात्मक वर्तनाचे चित्रणही यात केले आहे. स्वतः लेखकही महात्मा गांधी यांच्या तत्वनिष्ठ विचारांचे पाईक आहेत. हे या आत्मकथनातील अनेक प्रसंगातून व्यक्त होते. त्यांनी विद्यार्थीदशेतच समाजसेवेसाठी घराचा त्याग केला. नोकरी, सुख आणि वैभव यांना तिलांजली दिली. म. गांधींच्याआंतरजातीय विवाहाचे तत्वपालन करुन माया कुलकर्णी या गांधीवादी विचाराने झपाटून गेलेल्या व गांधी विचारांप्रमाणे जीवन जगणाऱ्या समविचारी तरुणीशी त्यांनी विवाह केला. निवडणुकांमध्ये त्यांना अनेकवेळा पैशांचे व इतरही अनेक गोष्टींचीही प्रलोंभने दाखविण्यात आली. परंतु गांधी तत्वांना व विचारांना तडा जाईल असे काहीही त्यांच्या हातून कधीच घडले नाही. महात्मा गांधी यांच्या विचारांचा तत्त्वनिष्ठ पाईक ते ठरले. म्हणून जगण्यासाठी त्यांनी पराकाष्टा केल्या. हालअपेष्टा सहन केल्या. ही मूल्य प्राणासमान जपली. त्यासाठी तुरुंगवासही भोगला. मार खाल्ला .दारिद्रय, उपासमार सहनकली. त्यांचे हे आत्मचरित्र वाचताना त्यांच्यातील गांधीविचार वाचकाच्याही व्यक्तिमत्वात मुरून जातो. चंद्रकांत वानखेडे यांच्याबद्दल वाचकांच्या मनात आदराची भावना निर्माण होते.तरुणांना समाजसेवेचा आदर्श निर्माण करण्यासाठी आणि समाजातील अन्याय-अत्याचार नष्ट करण्यासाठी चंद्रकांत वानखडे यांच्यासारखे निर्भिड, स्वाभिमानी आणि तत्त्वनिष्ठ

कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी हे आत्मकथन अत्यंत उपयुक्त ठरले आहे.

1)चंद्रकांत वानखडे, आपुला चि वाद आपणासी, मनोविकास प्रकाशन ,पुणे, चौथी जनआवृत्ती, जुलै- 2014.

2) डाॅ. श्री भगवान सिंह, गांधी आणि आंबेडकर, (अनुवाद सौ शीला बरडे-रणसुभे) सनई प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती ,जानेवारी 2011.

3)आनंद यादव ,आत्मचरित्र मीमांसा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ,प्रथमावृत्ती, फेब्रुवारी, 1998 .

4)कैलास सार्वेकर, मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर 1999.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com